**कंत्राटी पदभरती जाहिरात**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान**

जिल्हा आरोग्य सोसायटी, जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत खालील कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत

| अ.क्र. | पदाचे नाव(कार्यक्रम) | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | वय | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Staff Nurse (GNM) | ४१ (1 post for Psychiatric Nurse) | DH,RH, SDH, GMC, PHC | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, | GNM/BSc Nursing for Staff Nurse *GNM/Bsc With Certifiaction in Psychiatry from reputed institute or DPN OR MSc Nursing (Psy) for Psy Nurse | रु. २०,०००/- प्रति महा |
| २ | Medical Officer Male (RBSK) | ७ | RH,SDH | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, | BAMS | रु. २८,०००/- प्रति महा |
| ३ | Medical Officer Female (RBSK) | ७ | RH, SDH | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, | BAMS | रु. २८,०००/- प्रति महा |
| ४ | Radiologist | १ | SDH Shirpur | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्ष | MD Radiology/DMRD | रु. ७५,०००/- प्रति महा |
| ५ | Orthopedics | १ | RH,SDH | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्ष | MS Ortho/D Ortho | रु. ७५,०००/- प्रति महा |
| ६ | Obstrencian & Gynacologist | २ | RH, SDH | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्ष | MD/MS Gyn/DGO/DNB | रु. ७५,०००/- प्रति महा |
| ७ | Pediatrician | ५ | GMC/ SDH/RH | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्ष | MD Pediatrician/MBBS DCH | रु. ७५,०००/- प्रति महा |
| ८ | Anesthetic | २ | RH/SDH | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्ष | MD Anesthesia/DA/DNB | रु. ७५,०००/- प्रति महा |
| ९ | STLS | १ | RH | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, | DMLT 1 Year Experience | रु.२०,०००/- प्रति महा |
| १० | Counselor | १ | RH | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, | MSW 1 Year Experience | रु.२००००/- प्रति महा |
| ११ | Para Medical Worker | १ | RH | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्ष | SSC+Para Medical Worker Certificate/BSC+3 Year Experience | रु.२००००/- प्रति महा |
| १२ | Cold Chain Technician | १ | HQ Dhule | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील, निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्ष | 10+ITI in Mechanic Refrigeration & Air Conditioning | रु.१७०००/- प्रति महा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | Block Facilitator<br>सदर पदाला कोणतेही आरक्षण नाही. सदर पद फक्त महिलांसाठीच आहे | २ | NHM Office Dhule /Corporation | वय २१ ते ३८, आशा /गट प्रवर्तक पदावर काम करीत असल्यास वयोमर्यादेत नियमा नुसार सुट राहील. | Any Graduation MSCIT, Eng 40, MAR 30 Typing Word,Excel Work Experience | रुपये ८६००/- प्रति महा कामावर आधारीत मोबदला |

सदर पदांचा समांतर आरक्षणा निहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | पदाचे नांव | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | खेळाडु पु/म | प्रकल्प ग्रस्त | अर्धवेळ कर्मचारी | अपंग | इतर (खुला) | एकुण |
| १ | स्टाफ नर्स (जीएनएम) | एस सी | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| | | एस टी | २ | १ | १ | १ | ० | ६ | ११ |
| | | एन टी बी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | एन टी डी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | एस बी सी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | ओ बी सी | १ | ० | ० | १ | ० | ४ | ६ |
| | | इ डब्ल्यु एस | १ | ० | ० | ० | ० | ३ | ४ |
| | | खुला | २ | १ | १ | १ | २ | ८ | १५ |
| २ | वैदयकीय अधिकारी आरबीएसके (महिला) | एस सी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | एस टी | १ | ० | ० | १ | ० | ३ | ५ |
| | | व्ही जे एन टी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | वैदयकीय अधिकारी आरबीएसके (पुरुष) | एस सी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | एस टी | १ | ० | ० | १ | ० | ४ | ६ |
| | | खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | रेडिओलॉजीस्ट | खुला | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ५ | ऑर्थोपेडिक्स | खुला | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ६ | ऑबस्ट्रेशियन ॲण्ढ गायनॅकोलॉजीस्ट | एस टी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | खुला | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ७ | बालरोग तज्ञ | एस सी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | एस टी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | ओ बी सी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | इ डब्ल्यु एस | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | खुला | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ८ | भुलतज्ञ | एस टी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | खुला | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ९ | एस टी एल एस | एस टी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| १० | कौन्सीलर | एस टी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | पॅरा मेडिकल वर्कर | एस टी | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| १२ | कोल्ड चेन टेक्नीशियन | खुला | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

अटी व शर्ती :-

१) उपरोक्त पदे हि कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती दि. ३१/०८/२०२१ पर्यंत राहील.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू राहणार नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) सेवानिवृत्त विशेषतज्ञ/कर्मचारी यांचे निवड झालेस सदर पदांकरीता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहीत मार्गदर्शक सुचनांनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणमध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.,धुळे यांनी राखुन ठेवले आहेत.

७) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

८) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

९) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत, पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

१०) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

११) निवड यादीतील गुणक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करण्यात येईल.

१२) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ४३ वर्ष राहील.

१३) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया हि प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छानननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

१४) फक्त शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचा विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१५) विशेषतज्ञ/कर्मचारी या पदांकरीता शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ/अधिकारी या पदांकरीता अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजू झालेचा दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्त झालेचे वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन), या बाबतची संपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी.

१६) सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी यांनी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे वैदयकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. त्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१७) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलवुन मिळवण्याची मागणी करता येणार नाही.

१८) उपरोक्त पदापैकी तांत्रिक पदांकरीता, स्टाफ नर्स, वैदयकिय अधिकारी व विशेषतज्ञ इ. पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांस मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

१९) भरती प्रक्रिया स्थगीत करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

२०) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा रुग्णालय आवार, साक्री रोड धुळे येथे दि. १७/०२/२०२१ पासुन ते दि. २६/०२/२०२१ या कालावधीत कार्यालयीन सुटीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत व्यक्तीशः सादर करावेत.

२१) मुलाखतीकरता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही. तसेच एक कोरा लिफाफा ज्यावर रु.५/- टपाल तिकीट लावुन स्वतःचे नाव व पत्ता प्रती या ठिकाणी लिहुन अर्जासोबत जोडावा.

२२) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु. १५०/- व राखिव प्रवार्गातील उमेदवारांनी रु. १००/- चा डिमांड ड्राप्ट “District Integrated Health & Family Welfare Society Dhule” या नावे देय असलेला असावा.

२३) सदरहु भरती प्रक्रियेकरीता उमेदवारांनी अर्ज सादर करणेसाठी अंतिम मुदत दि. २६/ ०२/२०२१ अखेर राहणार आहे तदनंतर छाननी, लेखी परिक्षा/मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर www.mahaarogya.gov.in वर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

❖ खालील प्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या प्रती अर्जाच्या नमुन्यासोबत जोडाव्यात.

१)क्षैक्षणीक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका २) जातीचे प्रमाणपत्र ३) शाळा सोडल्याचा/जन्मतारखेचा दाखला ४) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचे २ फोटो ६) शासकीय अनुभव असलेला अनुभव दाखला.

स्वाक्षरीत/-
सदस्य सचिव
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, धुळे.

स्वाक्षरीत/-
अध्यक्ष निवड समिती
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, धुळे.